# १ कला रसास्वाद-प्रयोगजीवी कला

## कलेतील सौंदर्य समजून घेताना..

CJFY4E

**उद्दिष्टे :**

(१) नाट्य, संगीत व नृत्य या प्रयोगजीवी कलांचे महत्त्व स्वतःच्या शब्दांत सांगता येणे.

(२) नाट्य, नृत्य व संगीतामधील मूलभूत घटकांची तोंडओळख होणे.

(३) संगीत व नृत्यातील विविध कलाप्रकारांची नावे सांगता येणे व त्या कलाप्रकारांचे महत्त्व सांगता येणे.

(४) विविध प्रयोगजीवी कलाप्रकारांमधून स्वतःची अभिव्यक्ती करता येणे.

(५) एखाद्या कलाविष्कारामध्ये आपल्याला भावणारे घटक ओळखून त्यांचे वर्णन करता येणे.

- पहिल्या सत्रातील कलारसास्वादातील प्रकरणात आपण दृश्य कला व प्रयोगजीवी कला यांमधील फरक समजून घेतला.
- प्रयोगजीवी कला या अशा कला असतात ज्यांमध्ये थेट प्रेक्षकांसमोरच कलाविष्कार सादर केला जातो.
- प्रयोगजीवी कलांमध्ये जादूचे प्रयोग, बाहुल्यांचे खेळ, सर्कस, मूक नाट्य, वक्तृत्व, एकपात्री विनोदी प्रयोग इत्यादींचा देखील समावेश होतो, मात्र या सर्वांचे ढोबळमानाने नृत्य, नाटक व संगीत या तीन विभागात वर्गीकरण करता येईल. म्हणून हे तीन कलाप्रकार आपण जास्त सखोलपणे समजून घेऊ.



**नाटक :**



### चला नाटक करू...

दोन विद्यार्थ्यांना समोर यायला सांगा. त्यांपैकी एकाने पालक बनावे व दुसऱ्याने पाल्य व एक नाटुकली सादर करावी. विषय असा घ्यावा- पाल्य परीक्षेत नापास झाला/झाली आहे. विद्यार्थ्यांना विचार करायला सांगावे. अशा वेळी त्या दोघांमध्ये काय घडते ते आठवून नाटुकले सादर करावे. त्याकरिता त्यांना पाच मिनिटांचा वेळ द्या.

**चर्चा करा :**

- नाटुकलीत काम करणारे विद्यार्थी खऱ्या आई-वडलांसारखे वागण्याचा का प्रयत्न करत होती?
- जे सुरू आहे ते खोटे आहे हे माहीत असून देखील विद्यार्थ्यांना नाटुकले पाहण्यात रस का होता?
- जर नाटुकल्यात काम करणारे विद्यार्थी जास्तीत जास्त पालकांसारखे किंवा पाल्यांसारखे वागले असते तर इतर विद्यार्थ्यांना नाटुकले जास्त आवडले असते का? कारणे सांगा.

### १. नाटक म्हणजे काय?

मागील नाटुकलीत बघितल्याप्रमाणे आई/वडील/मुलगा/मुलगी यांचे काम करणारे विद्यार्थी त्यांच्यासारखे वागण्याचा प्रयत्न करत होते. बघणाऱ्या विद्यार्थ्यांना माहीत होते की जे त्यांच्या समोर सुरू आहे ते खोटे आहे. तरी देखील त्यांनी नाटुकली समरस होऊन पाहिली. विद्यार्थ्यांनी जे सादर केले त्याला 'नाटक' असे म्हणतात.

नाटक एक असा कलाप्रकार आहे की ज्यात कलाकार एक तात्पुरती, काल्पनिक ओळख किंवा भूमिका धारण करून ती प्रेक्षकांना शक्य तितकी खरी वाटेल अशा प्रकारे वठवण्याचा प्रयत्न करतो. थोडक्यात नाटक म्हणजे खोट्यातून खऱ्याचा आभास निर्माण करणे. म्हणूनच खोटे वागणाऱ्या माणसाला आपण 'नाटक करू नकोस' असे म्हणतो.



### २. अभिनय

एखादी काल्पनिक भूमिका धारण करणाऱ्याला अभिनेता/अभिनेत्री असे संबोधले जाते तर ती भूमिका वठवण्याच्या क्रियेला 'अभिनय करणे' असे संबोधले जाते.

भारतात अभिनयाचे चार प्रकार मानले जातात -

१. **आंगिक अभिनय :** शारीरिक हालचाली, देहबोली व चेहऱ्यावरील हावभावांचा वापर करून केल्या जाणाऱ्या अभिनयाला आंगिक अभिनय असे संबोधले जाते.

२. **वाचिक अभिनय :** शब्द, आवाजातील चढ-उतार, दोन शब्दांमध्ये किंवा वाक्यांमध्ये घेतलेला अवकाश यातून केल्या जाणाऱ्या अभिनयाला वाचिक अभिनय असे संबोधले जाते.

३. **आहार्य अभिनय :** अभिनय करणाऱ्या व्यक्तींची वेशभूषा, रंगभूषा, संगीत, त्यात वापरल्या गेलेल्या वस्तू यांच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या अभिनयाला आहार्य अभिनय असे संबोधले जाते.

४. **सात्त्विक अभिनय :** नाटकातील पात्र ज्या भावना अनुभवते, ज्या मन:स्थितीत असते, त्या भावना ती मन:स्थिती साकारणाऱ्या अभिनयाला सात्त्विक अभिनय असे संबोधले जाते.

भगवान शंकराची स्तुती करणाऱ्या खालील श्लोकामध्ये या चारही प्रकारांचा उल्लेख होतो.

**आंगिकं** भुवनं यस्य । **वाचिकं** सर्व वाङ्मयम्।।
**आहार्यं** चन्द्र तारादि। तं नुम: **सात्त्विकं** शिवम्।।

## ३. नाटकात संघर्षाचे महत्त्व

**गोष्ट –** एक मुलगी होती. तिला शिकण्याची खूप हौस होती. तिच्या आईवडलांनी तिला शाळेत पाठवले. ती नियमित अभ्यास करायची. तिला चांगले गुण मिळायचे. अशा पद्धतीने ती शिकत गेली व स्वतःच्या पायावर उभी राहिली.

**नाटकाचा गाभा त्यातील संघर्षात असतो. संघर्षाशिवाय कोणतेच नाटक उभे राहू शकत नाही.** एखाद्या गोष्टीत संघर्ष हा त्यातील माणसांमुळे किंवा घडामोडी/परिस्थितीमुळे निर्माण होतो. वरील उदाहरणातील गोष्टीत संघर्ष पुढील पद्धतीने निर्माण होऊ शकतो–तिच्या आईवडलांना तिला शाळेत पाठवायचे नाही किंवा आईवडलांकडे शाळेत दाखल करायला पैसे नसतात किंवा तिला शाळेतून काही कारणास्तव काढले जाते किंवा शाळेत जाताना तिला अपघात होतो इत्यादी.

**प्रथम गोष्ट वाचा. चर्चा करा**

१. त्यांना गोष्ट मनोरंजक वाटली का? गोष्टीत काय कमी आहे? या गोष्टीचे नाटकात रूपांतर केल्यास ते प्रेक्षकांना आवडेल का?

२. दिलेल्या गोष्टीला मनोरंजक करण्यासाठी काय करता येईल असे तुम्हांला वाटते?

***विचारात घेण्याचे मुद्दे :***

- *नाटक या कलाप्रकारात आवाज, हावभाव व शरीराच्या हालचाली ही अभिनेत्याकडे/अभिनेत्रीकडे असलेली साधने आहेत. ज्यांचा वापर करून तो/ती आपले विचार भावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचवू शकतो/शकते.*
- *अभिनय करताना मोठा, सुस्पष्ट आवाज व आवाजातील चढ–उतार अत्यंत महत्त्वाचे असतात.*

## ४. मोठा व सुस्पष्ट आवाज विकसित करण्यासाठी व्यायाम

१. ताठ बसा. खोल श्वास घेऊन तुमचे तोंड उघडून ‘आऽऽ ’ असा स्वर तोंडातून काढत तोंडावाटे श्वास बाहेर सोडा. श्वास संपला की ही क्रिया पुन्हा करा. किमान १० वेळा करा.

२. ताठ बसा. खोल श्वास घेऊन तुमचे तोंड बंद करून ‘मऽऽ ’ असा स्वर तोंडातून काढत नाकावाटे श्वास बाहेर सोडा. तुमच्या गालांवर कंपने जाणवली पाहिजेत. किमान १० वेळा करा.

३. एक खोल श्वास घेऊन तोंडाने एक फुगा फुगवा व त्याचा आकार बघा. प्रत्येक वेळी फुग्याचा आकार वाढवायचा प्रयत्न करा.

## थोडी गंमत करू

**आवाजातील चढ उतार**

खाली दिलेले वाक्य वेगवेगळ्या शब्दांवर जोर/भर देऊन बोलून पहा.

‘‘मला तुला आज भेटता येणार नाही’’

‘‘**मला** तुला आज भेटता येणार नाही’’ (दुसरे कोणीतरी भेटू शकेल)

‘‘मला **तुला** आज भेटता येणार नाही’’ (मी दुसऱ्या कोणालातरी भेटू शकेन)

‘‘मला तुला **आज** भेटता येणार नाही’’ (उद्या/परवा भेटता येईल)

‘‘मला तुला आज **भेटता** येणार नाही’’ (फोनवर बोलता येईल)

‘‘मला तुला आज भेटता **येणार नाही**’’ (मला तुला आज भेटणे अशक्य आहे)

**चर्चा करा :**

- वेगवेगळ्या शब्दांवर जोर दिल्यास वाक्याचा अर्थ बदलतो का?
- काही शब्द वरच्या आवाजात जोर देऊन तर काही शब्द हळू खालच्या आवाजात म्हणणे याला आवाजातील चढ उतार असे म्हटले जाते हे मुलांना समजवा.

## ५. प्रसंगानुरूप आवाजात होणारा बदल

एक-एक विद्यार्थ्याने वर्गासमोर येऊन खाली दिलेली वाक्ये ते खऱ्या आयुष्यात ज्या पद्धतीने म्हणतील त्या प्रमाणे म्हणावीत.




**चर्चा करा :**

- त्यांच्या आवाजात वाक्यानुरूप काही बदल जाणवला का?
- ध्वनी/आवाजातील उत्साह कमी जास्त झाला का?
- कुणाशी एखादे वाक्य बोलले जाते आहे त्यानुसार त्यात फरक होतो का?

## ६. प्रसंगानुरूप देहबोलीत होणारा फरक

एका विद्यार्थ्याला वर्गासमोर बोलावून खालील कृती करायला सांगा.

१. ताठ, तटस्थ उभे राहून शरीराची कुठलीही हालचाल न करता फक्त आवाजातील योग्य चढ-उतार व हावभाव वापरून खालील गोष्टी म्हणा -
   ''आग लागली आहे पळा.''
   ''माझ्याशी खोटं बोलू नकोस!.''
   ''मला तुझं तोंडदेखील पाहायचं नाही.''
   ''चल, आपण मजा करू.''

२. आता खूप हातवारे व आवाज वरखाली करून खालील गोष्टी म्हणा-
   ''आज मला खूप शांत वाटतं आहे.''
   ''मी तुझं दुःख समजू शकते. देव तुझं भले करो.''

**चर्चा करा :**

- सांगितलेल्या कृती तुम्हांला अनैसर्गिक/कठीण वाटल्या का? कारणे सांगा?
- काय केले असता त्या कृती नैसर्गिक वाटतील?

***विचारात घेण्याचे मुद्दे :***

- *भावना, देहबोली व आवाज यांचा परस्पर संबंध असतो. अभिनय करताना या गोष्टीचे भान ठेवले पाहिजे.*
- *जेव्हा आपण उत्तेजित होऊन बोलतो तेव्हा आवाज नैसर्गिकपणे वाढतो व आपण खूप हातवारे करून बोलतो. जेव्हा आपण दुःखी किंवा मलूल असतो तेव्हा आवाज व देहबोली देखील शांत असते.*

## ७. नाटकातील व्यक्तिरेखा :

थोडा विचार करा-

- मुलांशी चर्चा करा की एखादी व्यक्ती कसे कपडे घालते, कशी चालते, उठते, बसते, तिची भाषा कशी आहे यावरून आपल्याला त्या व्यक्तीच्या वयाचा, सांपत्तिक व सामाजिक स्थितीचा अंदाज येऊ शकतो. मग जर आपल्याला एखाद्या विशिष्ट व्यक्तीची भूमिका नाटकात रंगवायची असेल तर आपण काय केले पाहिजे?
- नाटकात काम करणारा प्रत्येक कलाकार कुठली तरी भूमिका रंगवत असतो. ज्या व्यक्तीची भूमिका रंगवायची असेल, तिचे वय, सामाजिक-आर्थिक स्थिती, व्यवसाय, स्वभाव, लकबी, मूल्य, विचार इत्यादींचा विचार करून ती व्यक्ती कशी असेल याची एक आखणी केली जाते. तिला 'व्यक्तिरेखा' असे म्हणतात.

- नाटकात काम करताना/नाटक लिहिताना व्यक्तिरेखेप्रमाणे भाषा, संवाद, पोशाख असला पाहिजे याची काळजी घ्यावी लागते.
- आपण व्यक्तिरेखांचा जितका खोलवर विचार करू, तितकी ती व्यक्तिरेखा खरी/जिवंत वाटेल व नाटक मनोरंजक होऊ शकेल.

## थोडी गंमत करू

विद्यार्थ्यांनी पुढे येऊन खाली दिलेल्या भूमिका रंगवाव्यात. दिलेल्या व्यक्तींच्या आवाजाचा, भाषेचा व देहबोलीचा विचार करून त्याची नक्कल करावी. किमान पाच वाक्ये बोलावीत. (१) म्हातारी, गरीब शेतमजूर बाई (२) महाविद्यालयात शिकणारा युवक. (३) मध्यमवयीन डॉक्टर. (४) घरगुती साहित्य घरोघरी विकणारी स्त्री. (५) एक लोकप्रिय चित्रपट अभिनेता.

## ८. नाटुकले उभे करणे :

एखादी गोष्ट किंवा प्रसंग ज्यात संघर्षाचे बीज असेल. ⇨ गोष्टीतील व्यक्तिरेखा, त्यांची भाषा, आवाज, देहबोली, पोशाख. ⇨ प्रत्येक व्यक्तिरेखा रंगवणाऱ्या कलाकाराच्या तोंडी असणारे संवाद.

एखादे मनोरंजक नाटुकले उभे करण्यासाठी वरील गोष्टींचा विचार करावा लागतो.

(१) विद्यार्थ्यांचे गट करा.

(२) प्रत्येक गटाला शिक्षकाने एक विषय द्यावा.

(३) प्रत्येक गटाने त्या विषयावर विचार करून अशा एखाद्या गोष्टीचा/प्रसंगाचा विचार करावा ज्यात संघर्ष असेल. त्यातील व्यक्तिरेखा ठरवाव्यात व मग त्याप्रमाणे संवाद लिहावेत.

(४) प्रत्येकाला कुठलीतरी भूमिका रंगवायला मिळेल याची काळजी घ्यावी.

(५) शक्य झाल्यास तुमच्या वार्षिक स्नेहसंमेलनात किंवा एखाद्या कार्यक्रमाच्या प्रसंगी नाटुकले प्रस्तुत करावे.

### उदाहरणादाखल काही विषय :

(१) कुणाचीतरी/कशाचीतरी वाट पाहणे (उदा. शेतकरी पावसाची वाट पाहतो, आई मुलीची वाट बघते, दोन लोक बसची वाट बघतात इत्यादी.)

(२) गैरसमज होणे (उदा. एकाच नावाच्या दोन व्यक्ती असल्यामुळे, घड्याळ मध्येच बंद पडल्यामुळे गैरसमज होणे)

(३) परत येणे (उदा. बाहेर देशातून भारतात परतणे, चुकलेला मुलगा परत घरी येणे इत्यादी,

(४) पश्चात्ताप करणे (कष्ट न केल्याचा, उद्धटपणे बोलल्याचा, उशीर झाल्याचा पश्चाताप इत्यादी.)

हे विषय फक्त उदाहरणादाखल दिले आहेत. शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी मिळून स्वतःच्या कल्पनेने देखील विषय ठरवता येतील. कुठलेही नाटुकले उभे करणे ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. ती निर्धारित तासिकांमध्ये होणे शक्य नाही. त्यासाठी शाळाबाह्य वेळेचा वापर करून पाठात दिलेल्या संकल्पना विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या समजावून सांगण्यासाठी उपक्रम घेत राहणे महत्त्वाचे आहे.

## नृत्य :

आपल्या रोजच्या जीवनात आपण अनेक क्रिया करत असतो, जसे की चालणे, एखाद्या वस्तूकडे बोट दाखवणे, एखाद्याला बोलावणे, नाही म्हणणे, दरवाजा बंद करणे इत्यादी. त्यात व नृत्यात केलेल्या हालचालींमध्ये काय फरक आहे?

तुम्ही गॅदरिंगमध्ये, किंवा टी. व्ही. वर वेगवेगळे नृत्यप्रकार पाहिले असतील. वर नमूद केलेल्या दैनंदिन क्रिया तुम्ही पाहिलेल्या नृत्यप्रकारामध्ये करून बघा.

**चर्चा करा :**

- आपल्या दैनंदिन हालचाली नृत्यातील हालचाली इतक्या डौलदार असतात का?
- आपल्या दैनंदिन हालचाली आपण एका लयीत अथवा ठेक्यात करतो का?
- आपल्या दैनंदिन हालचाली आपण सलग, क्रमबद्ध पद्धतीने करतो का?

### ९. नृत्य म्हणजे काय?

**नृत्य हा असा कलाप्रकार आहे, ज्यामध्ये हेतुपूर्वक निवडलेल्या सुंदर हालचाली, क्रमवार आणि लयबद्ध रीतीने एखादा आशय व्यक्त करण्यासाठी केल्या जातात.** बहुतांश वेळा नृत्याला संगीताची साथ असते. आशय किंवा अभिव्यक्तीशिवाय नृत्याला व्यायामाचे स्वरूप येऊ शकते.

## करून बघू या

### १०. नृत्यातील हालचाली :



आपल्या शरीराच्या हालचालींद्वारे खाली नमूद केलेल्या गोष्टींना एका नृत्यात सादर कसे करायचे असा विचार तुम्ही करू शकाल? तुम्हांला योग्य वाटेल असा कोणताही नृत्य प्रकार वापरा. ज्या विद्यार्थ्यांना इच्छा असेल त्यांनी वर्गासमोर हा नृत्यप्रकार सादर करावा.

(१) मांजर, साप, सिंह, माणूस इत्यादी प्राण्यांच्या हालचाली

(२) नदी, झाडे, गाडी, वादळ, इत्यादी.

(३) थांबणे, लढणे, विचार करणे इत्यादी क्रिया

### ११. नृत्यातील हावभाव :



चेहऱ्यावरील हावभाव, शारीरिक मुद्रा व तुम्हांला योग्य वाटेल ते संगीत वापरून एक नृत्य सादर करा. त्याद्वारे खाली नमूद केलेल्या मानवी भावना प्रकट झाल्या पाहिजेत. तुम्ही कोणताही नृत्यप्रकार वापरू शकता. ज्या विद्यार्थ्यांची इच्छा असेल त्यांनी वर्गासमोर नृत्यप्रकार सादर करावा.

(१) राग (२) आनंद (३) भीती (४) सहानुभूती (५) मत्सर इत्यादी.

***विचारात घेण्याचे मुद्दे :***

- *चेहऱ्यावरचे हावभाव आणि लयबद्ध शारीरिक हालचाली ही नृत्याची दोन मुख्य अंगे आहेत.*
- *त्यांचा योग्य वापर करून नर्तक/नर्तकी त्यांना अपेक्षित असलेला आशय प्रेक्षकांपर्यंत पोहचवतात.*

### नृत्य दिग्दर्शन :

हावभाव आणि लयबद्ध शारीरिक हालचालींचा एक सौंदर्यपूर्ण क्रम ठरवून नृत्य बसवणे याला नृत्य दिग्दर्शन असे म्हणतात. ते नृत्य, प्रेक्षकांना कसे दिसेल आणि त्यांच्या मनात काय प्रतिबिंब निर्माण होईल याचा विचार देखील नृत्य दिग्दर्शनात करावा लागतो. जी व्यक्ती नृत्य दिग्दर्शन करते तिला नृत्य दिग्दर्शक म्हणतात. संगीत, गाण्याचे शब्द, भाव लक्षात घेऊन नृत्य दिग्दर्शक नृत्य रचना करतो.

## करून बघा

विद्यार्थ्यांचे गट तयार करा. प्रत्येक गटाने आपल्या आवडीचे संगीत अथवा गाणे किंवा एखादी कविता निवडून तिला चाल लावूनही त्यावर नृत्यात्मक हालचाली बसवता येतील. गटातील प्रत्येक विद्यार्थ्याने नृत्यातील हालचालींच्या एका क्रमाचे दिग्दर्शन करावे. निवडलेल्या संगीतावर अथवा गाण्यावर नृत्य बसले की ते वर्गासमोर सादर करावे. एका गटाचे नृत्य सुरू असताना इतर गटांनी त्याचे अवलोकन खालील मुद्दे विचारात घेऊन करावे :

(१) नृत्याचा आणि गाण्यातील शब्दांचा संबंध जाणवला का?
(२) नृत्य सादर करणाऱ्या गटातील विद्यार्थ्यांमध्ये ताळमेळ होता का?
(३) नृत्य गाण्यातील ठेक्याप्रमाणे सादर झाले का?
(४) नृत्याच्या हालचालींमध्ये तोचतोचपणा जाणवला का?
(५) नृत्यामध्ये काही नावीन्य जाणवले का?
(६) नृत्य जोमदार वाटले का?
(७) नृत्य परिणामकारक वाटले का?
(८) नृत्यातून योग्य तो आशय प्रेक्षकांपर्यंत पोहोचला का? काय वाटते?

### भारतीय नृत्यप्रकार :

संगीताप्रमाणे नृत्याचे वर्गीकरण देखील शास्त्रीय, लोक नृत्य, चित्रपटगीतांवरील मुक्त नृत्य, इत्यादी नृत्यप्रकारांमध्ये करातात.

### शास्त्रीय नृत्य :

नाट्यशास्त्रामध्ये नमूद केलेल्या नियमावलींचे काटेकोर पालन करणाऱ्या नृत्यप्रकारांनाच भारतात शास्त्रीय नृत्याचा दर्जा दिला जातो. यामध्ये बहुतांश वेळा पौराणिक कथांचा अंतर्भाव करण्यात येत असे. कालांतराने शास्त्रीय नृत्यात सामाजिक जाणिवांचा आणि त्यांच्या अभिव्यक्तीचा देखील अंतर्भाव होऊ लागला. भारतात शास्त्रीय नृत्याचे आठ प्रकार आहेत.

### भरतनाट्यम :

हा नृत्यप्रकार अंदाजे २००० वर्षे जुना आहे. या नृत्यप्रकाराबद्दल भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात देखील उल्लेख सापडतात. हिंदू धर्मातील गोष्टी आणि तत्त्वज्ञान यांच्या आधारे भरतनाट्यमचे सादरीकरण होते.

### कथक :

कथा या मूळ शब्दापासून तयार झालेल्या 'कथक' या शब्दाचा अर्थ म्हणजे कथा सांगण्याची कला. या प्रकाराचा उगम उत्तर हिंदुस्थानात झाला.

**कुचिपुडी :**



या नृत्यप्रकाराचा उगम आंध्रप्रदेशात झाला. श्री सिधेंद्र योगी या वैष्णव कवीने या नृत्यप्रकारासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

**उडीसी :**

भुवनेश्वर जवळील इ.स.पू. दुसऱ्या शतकातील गुहांमध्ये देखील या नृत्यप्रकाराचे पुरावे सापडतात. उडीसी नृत्य मुख्यत्वेकरून स्त्री नर्तक सादर करत असत. विविध देवतांशी निगडित पुराणकथा या नृत्याद्वारे सांगितल्या जात.

**सत्रिया :**

हा नृत्य-नाट्य प्रकाराचा उगम १५ व्या शतकात आसाम येथे झाला. त्या काळचे विद्वान श्रीमंत शंकरदेव यांना या नृत्यप्रकारच्या निर्मितीचे श्रेय दिले जाते. वैष्णव मठांद्वारे (सत्रांद्वारे) या नृत्यप्रकाराची परंपरा जोपासण्यात आली म्हणून या नृत्यप्रकारास सत्रिया म्हटले जाते.

**मणिपुरी :**

मणिपूर येथे या नृत्यप्रकाराचा उगम झाला. मणिपुरी हा एक सामूहिक नृत्याचा प्रकार आहे. बहुतांश राधा कृष्णाच्या गोष्टींवर आधारीत सादरीकरण यामध्ये केले जाते.

**मोहिनीअट्टम :**

भगवान विष्णूच्या मोहिनी अवतारावरून नाव लाभलेला हा नृत्यप्रकार केरळ येथे उदयास आला. या नृत्यप्रकारातील हालचाली अतिशय नाजूक हळुवार पद्धतीच्या असतात. हा नृत्यप्रकार फक्त स्त्रियांद्वारे सादर केला जातो.

**कथकली :**

कथकली (कथा + कली = सादरीकरण) हा एक नृत्य-नाट्य प्रकार आहे. या नृत्यातील कलाकारांची वेशभूषा, चेहऱ्याची रंगीबेरंगी सजावट आणि मुखवटे यांमुळे हा नृत्यप्रकार विशेष आकर्षक वाटतो. हे नृत्य बहुतांश वेळा पुरुष कलाकारच सादर करतात. दक्षिण भारतातील कलरीपायट्टू या मार्शल आर्ट परंपरेचा कथकली नृत्य प्रकारावर बराच प्रभाव जाणवतो.

**लोकनृत्य :**

लोकसंगीताप्रमाणेच लोक नृत्याचा देखील अर्थ - लोकांनी एकत्र येऊन केलेले नृत्य. विशिष्ट समुदायातील लोकांनी विशिष्ट प्रसंगी एकत्र येऊन केलेले सामूहिक नृत्य.

भारतातील विविधतेमुळे लोकनृत्याची समृद्ध परंपरा भारतात सगळीकडेच दिसते. वेगवेगळ्या प्रदेशातील लोकनृत्यांच्या ढंगात बरीच विविधता आढळून येते.

दांडिया, गरबा, भांगडा, लावणी, घुमार, कोळी नृत्य असे बरेच लोकनृत्य प्रकार आपल्याकडे केले जातात. भारतातील आदिवासी समुदायांच्या संस्कृतीमध्ये देखील पारंपरिक नृत्यांना विशेष स्थान आहे. महाराष्ट्राच्या डोंगराळ भागातील आदिवासी लोक तारपा या भोपळ्यापासून बनवलेल्या वाद्याच्या साथीवर पारंपरिक नृत्य करतात. या नृत्याला तारपा नृत्य असे म्हणतात.

## चित्रपटगीतांवरील मुक्त नृत्य :

भारतातील आणि बाहेरील विविध नृत्य प्रकारांचे मिश्रण आपल्याला चित्रपटगीतांवरील नृत्यांमध्ये पाहायला मिळते. चित्रपटगीतांवरील नृत्य हे बहुतांश वेळा मुक्तप्रवाही असते.

## विविध नृत्यप्रकारांचा अभ्यास :

विद्यार्थ्यांचे गट तयार करा. प्रत्येक गटाने एक शास्त्रीय अथवा लोकनृत्याचा प्रकार निवडावा आणि त्याबद्दल माहिती मिळवून वर्गासमोर ती मांडावी. माहिती मिळवताना खालील मुद्द्यांचा उपयोग होऊ शकतो :

(१) भारतातील कोणत्या राज्यात या नृत्यप्रकाराचा उगम झाला?

(२) हे नृत्य सादर करताना कोणती वेशभूषा करतात?

(३) हे नृत्य कोणत्या विशिष्ट प्रसंगी अथवा विशिष्ट ऋतूत सादर केले जाते का?

(४) या नृत्यप्रकारात पारंगत अशा काही प्रसिद्ध व्यक्तींची नावे मिळवा. शक्य झाल्यास नृत्यप्रकाराची एक झलक वर्गासमोर सादर करा अथवा त्याच्या मूळ सादरीकरणाचा व्हिडिओ वर्गातील इतर विद्यार्थ्यांना दाखवा.

**चर्चा करा :**

• टी. व्ही. आणि चित्रपटातून जे नृत्य आपण बघतो त्यावर विचार करतो का?

• जी नृत्ये आपण बघितली ती फक्त जोमदार, जोशपूर्ण होती की त्यात आशय व्यक्त करणाऱ्या अर्थपूर्ण हालचाली देखील होत्या?

• काही नृत्यांमध्ये व्यायामासारख्या दिसणाऱ्या हालचाली असतात तर काहींमधील अंगविक्षेप कुटुंबातील सर्व सदस्यांनी मिळून बघण्यासारखे वाटत नाहीत, याकडे तुमचे लक्ष असते का? काही नृत्य जोमदार, अर्थपूर्ण हालाचालींनी बांधलेली असतात. ती बघायला मनाला छान वाटते. आशय देखील उत्तमरीतीने पोहोचविलेला असतो. अशा काही चित्रपटगीतांवरील नृत्ये तुम्ही सांगू शकाल का?

• त्यांचे विश्लेषण, परीक्षण, वर्गीकरण करू शकाल का? आपल्या अभिरूचीसंपन्नतेसाठी नृत्यांकडे अशा प्रकारे बघणे महत्त्वाचे वाटते का?

## संगीत :

### १. ध्वनी : आपल्या आजूबाजूच्या आवाजांचे निरीक्षण करू या.

तुमच्या वहीत, तुम्हांला दैनंदिन जीवनात ऐकू येणाऱ्या शक्य तितक्या आवाजांची यादी करा. पक्ष्यांचा किलबिलाट, गाडीचा हॉर्न, माणसांचे आवाज, रेल्वेचा आवाज इत्यादी.

### २. नाद :

काही आवाज कर्णमधुर असतात तर काही कर्कश असतात. कर्णमधुर आवाजाला 'नाद' असे संबोधले जाते. एखाद्या गाडीचा ब्रेक लागण्याने होणारा आवाज, लोकांचा गोंगाट हा कर्णमधुर नसतो. त्यामुळे तो नाद नसतो. तुम्ही केलेल्या यादीत नाद कोणते ते तुम्हांला ओळखता येतील का?

**चर्चा करा :**

१. सांगितलेली कृती करायला सोपी होती की कठीण वाटली? का?

२. यादीतील आवाजांचे कर्णमधुर/ कर्कश असे काही वर्गीकरण करता येईल का?

### ३. स्वर :

कायम टिकणारा व कर्णमधुर असणारा नाद संगीतोपयोगी असतो. संगीतोपयोगी नादाला 'स्वर' असे संबोधले जाते. **स्वरांच्या साखळीला किंवा विशिष्ट रचनेला सुरावट किंवा चाल असे संबोधले जाते**. चालीप्रमाणे स्वरांमध्ये व त्यामुळेच आवाजामध्ये फरक होतो.

आपण सर्व जण रोज राष्ट्रगीत गातो. राष्ट्रगीताची शेवटची ओळ आठवा. **'जय जय जय जय हे'** जेव्हा तुम्ही ती शेवटची ओळ गाता, तेव्हा प्रत्येक 'जय' म्हणताना तुम्हाला काही फरक जाणवतो का? शब्द तर तेच असतात, मग कशात बदल होतो? आवाज लहान मोठा होतो का?

आपण राष्ट्रगीत कितीही मोठ्या आवाजात किंवा कितीही हळू आवाजात गायले, तरी शेवटच्या ओळीमधील प्रत्येक 'जय' वेगळा वाटतो. हा फरक प्रत्येक 'जय' म्हणताना त्याचे स्वर वेगळे असल्यामुळे जाणवतो. स्वर हा संगीतातला मूलभूत घटक आहे. राष्ट्रगीतातील शेवटच्या ओळीत प्रत्येक 'जय' चे स्वर आधीच्या 'जय' पेक्षा वर चढत जातात.

- काचेच्या भांड्यांमध्ये/पेल्यांमध्ये वेगवेगळ्या मात्रेत पाणी भरा. प्रत्येक भांड्यावर चमच्याने हलकेच मारून बघा निघणारे स्वर ऐकून विद्यार्थ्यांना खालच्या स्वरापासून वरच्या स्वरापर्यंत क्रमाने ऐकू येतील अशी पेल्यांची मांडणी करायला सांगा.

**चर्चा करा :**
आई व वडील यांनी हीच वाक्ये म्हटली तरी त्यांच्या स्वरात फरक जाणवतो.

### ४. ठेका/ताल :

वर्गात एखादे जोशपूर्ण गाणे लावा व त्यानुसार तुम्ही कशा टाळ्या वाजवता, पाय कसे हलवता याकडे लक्ष द्या. आता एखादे संथ गाणे लावा व पुन्हा निरीक्षण करा. ज्या वारंवारतेने तुम्ही टाळ्या वाजवल्या त्यास 'ठेका' असे संबोधले जाते. ठेक्यालाच ताल असेही संबोधले जाते. गणपतीच्या मिरवणुकीत वाजणारा ढोल आठवल्यास तुम्हांला ठेका ही संज्ञा अधिक स्पष्ट होऊ शकेल.

**चर्चा करा :**
१. टाळ्या वाजवणे, पाय आपटणे यांची ठरावीक काळानंतर पुनरावृत्ती होत होती का?
२. दोन्ही गाण्यांवर वाजणाऱ्या टाळ्यांच्या वारंवारतेत फरक होता का?

### ५. लय :

ठेक्याच्या गतीला लय असे संबोधले जाते. कुठलीही सुरावट किंवा चाल ही स्वर, ताल व लय यांनी मिळून बनलेली असते. सुरावटीत जशी लय असते, तशीच निसर्गाचीही लय असते. ठरावीक वेळेनंतर रात्र सरून दिवस होतो व परत दिवस सरून रात्र होते, ठरावीक काळानंतर ऋतू बदलतात असे निसर्गाचे चक्र सुरू असते.

मात्र ऋतूंचे आगमन लवकर किंवा उशीरा झाले तर निसर्गाची 'लय' बिघडली आहे असे आपण म्हणतो. आपल्या हृदयाच्या ठोक्यांचीदेखील एक ठरावीक गती असते. त्याला आपण हृदयाच्या ठोक्यांची लय असे म्हणतो. रेल्वेच्या आवाजालादेखील एक लय असते.

## थोडी गंमत करू

**लय असणारे आवाज शोधणे :** तुमच्या परिसरातील असे आवाज शोधा ज्यांना स्वतःची लय आहे.

**विविध लयीतील ठेके वाजवून एखादी रचना निर्माण करणे :** मुलांचे गट तयार करा. प्रत्येकाने एक विशिष्ट ध्वनी निर्माण करावा- उदा. कंपासपेटीवर पेन आपटून निर्माण होणारा ध्वनी, टेबलावर हात आपटून निर्माण होणारा ध्वनी, चुटकी वाजवून निर्माण केलेला, टाळी वाजवून निर्माण केलेला ध्वनी. प्रत्येकाने स्वतः निश्चित केलेला ध्वनी आपल्याला आवडेल त्या लयीत ठेक्याच्या स्वरूपात निर्माण करून एकत्रितपणे एखादी रचना निर्माण करायचा प्रयत्न करावा.

**६. संगीत म्हणजे काय?** **गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते।।**

वरील श्लोकानुसार गायन, वादन व नृत्य या कलांच्या समुच्चयाने संगीत निर्माण होते. संगीतात स्वर, ताल व लय यांचा समन्वय साधावा लागातो. स्वर, ताल व लय हे संगीताचे मूलभूत घटक आहेत.

**७. संगीतातील भाव**

१. एखादे जोशपूर्ण गाणे ऐकून तुम्हांला नाचावेसे वाटते का?

२. देशभक्तीपर गीत ऐकून तुम्हांला अभिमान वाटतो का?

३. उदास गाणे ऐकून तुम्हांला देखील एकाप्रकारे उदास वाटते का?

४. अंगाईगीत ऐकल्यावर तुम्हांला शांत वाटते का?

संगीतामध्ये श्रोत्यांच्या भावनांना साद घालण्याची विलक्षण ताकद असते. नाटकाप्रमाणेच, गाणारा/वाजवणारा कलाकार जितक्या आत्मियतेने, प्रामाणिकपणे त्याच्या भावना श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करेल, तितक्या त्या श्रोत्यांच्या मनाला भिडतात. अशा प्रकारचे संगीत **'भावपूर्ण संगीत' समजले जाते.**

**चर्चा करा :**

१. विविध प्रकारची गाणी ऐकून आपल्यामध्ये ज्या भावना निर्माण होतात त्या नेमक्या कशाने होतात? शब्द, चाल (स्वर) की ठेका? की सर्व मिळून एकत्रितपणे?

२. गंमत म्हणून काही गाण्यांची चाल, ठेका किंवा शब्द बदलून बघा. काय जाणवते?

**८. वाद्य संगीत :**

तुमच्या आवडत्या कार्टूनच्या हालचालींमागे वाजणारे संगीत आठवा. १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला परेड करते वेळी वाजणारे संगीत आठवा त्यात स्वर असतात मात्र शब्द नसतात किंवा मानवी आवाज नसतो. तरी देखील त्यामुळे देशप्रेमाची एक भावना आपल्या मनात जागृत होते. संगीतात फक्त शब्दांमार्फतच भावनांना साद घालता येते असे नाही. ज्या संगीतात कोणतेही शब्द नसतात व जे केवळ एक किंवा अनेक वाद्ये (उदा. तबला, पेटी, सतार, संतूर इत्यादी) वाजवून निर्माण केले जाते त्यास **'वाद्य संगीत'** असे संबोधले जाते. पंडित हरिप्रसाद चौरसिया, डॉ. एन. राजम, पंडित रविशंकर, पंडित शिवकुमार शर्मा, उस्ताद झाकीर हुसैन असे अनेक कलाकार एकल वाद्य वादनासाठी प्रसिद्ध आहेत.

**९. वाद्यांचे प्रकार :**

भारतात सर्वसाधारणपणे वाजविल्या जाणाऱ्या काही वाद्यांची नावे खाली दिली आहेत.

| ताल वाद्य | तंतू वाद्य | सुशीर वाद्य |
|---|---|---|
| तबला, ढोल, डफ, पखवाज, ताशा, मृदुंग इत्यादी. | सतार, तंबोरा, व्हायोलीन, सारंगी, संतूर इत्यादी | बासरी, बिगुल, तुतारी, शहनाई इत्यादी. |



## थोडी गंमत करू

विद्यार्थ्यांचे गट करा. आधी दिलेल्या यादी पैकी कुठलेही एक वाद्य निवडा. त्याबद्दल खालील मुद्द्यांच्या आधारे माहिति गोळा करून सादरीकरण करा.

(१) वाद्याचा प्रकार
(२) त्याचा फोटो किंवा चित्र
(३) वाद्यातून ध्वनी कसा निर्माण होतो त्याबद्दल माहिती
(४) ते वाद्य वाजवणारे काही लोकप्रिय कलाकार.
(५) एखादे चित्रपट गीत/लोकगीत ज्यात ते वाद्य वाजवले गेले आहे.

### १०. संगीताविना जीवन :

कल्पना करा की एके दिवशी तुमच्या आयुष्यातले सर्व संगीत गायब झाले तर? शाळेतील प्रार्थना, वर्गात गायली जाणारी गाणी, मोबाईलच्या अलार्ममधील गाणे, रिंगटोन, दारावरच्या बेलमुळे वाजणारे संगीत, रेडिओ किंवा टी. व्ही वर वाजणारी गाणी इत्यादी सर्व नाहीसे झाले तर? काय-काय परिणाम होतील?

### ११. भारतीय संगीतातील प्रकार :

भारतामध्ये प्रचंड प्रमाणात धार्मिक, भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक विविधता आढळून येते. हीच विविधता आपल्याला भारतीय संगीतात देखील दिसून येते. खाली भारतातील काही मुख्य संगीत प्रकारांबद्दल माहिती दिली आहे.

#### भारतीय शास्त्रीय संगीत :

शास्त्रीय संगीतामध्ये कंठ संगीत व वाद्य संगीत या दोन्हींचा समावेश होतो. शास्त्रीय संगीतात ठरावीक संरचनेच्या व नियमांच्या चौकटीत राहूनच संगीत निर्मिती केली जाते. 'राग' व 'ताल' हे शास्त्रीय संगीताचे दोन मूलभूत घटक आहेत. प्रत्येक रागाचे स्वतःचे नियम असतात. त्यात काही ठरावीक स्वरांचाच वापर ठरावीक पद्धतीने करता येतो. प्रत्येक तालाचे देखील स्वतःचे नियम असतात. भारतीय शास्त्रीय संगीताचे 'उत्तर हिंदुस्थानी संगीत' व 'दक्षिण हिंदुस्थानी संगीत' असे दोन भाग पडतात. पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व, गानसरस्वती किशोरीताई आमोणकर, बेगम अख्तर यांसारखे अनेक शास्त्रीय संगीत गायक भारतात प्रसिद्ध झाले. तसेच अनेक शास्त्रीय एकल वाद्यवादक देखील प्रसिद्ध झाले.

#### लोक संगीत :

लोक संगीत म्हणजे लोकांचे संगीत. लोकसंगीताचा उगम लोकांच्या परंपरा व संस्कृतीतून होतो व ते पिढ्यानपिढ्या चालत आलेले असते. भारतातील भौगोलिक परिस्थितीनुसार लोकसंगीत बदलले हे आपल्याला दिसून येते.

१. शक्य तितक्या लोकसंगीताचे नमुने विद्यार्थ्यांना ऐकवण्याची/दाखवण्याची सोय करा.
२. विद्यार्थ्यांनी एखाद्या संगीत कार्यक्रमाला भेट दिली असल्यास त्या अनुभवावर चर्चा करा.

## महाराष्ट्रातील लोकप्रिय लोकसंगीत –

- **पोवाडा :**

पोवाडा हे एक जोशपूर्ण गीत असते. त्याचा हेतू मुख्यत्वे ऐतिहासिक घटनांचे वर्णन करून लोकांना स्फुरण देणे असा असतो. पोवाडा लिहिणाऱ्या व सादर करणाऱ्या कलाकारास शाहीर असे संबोधले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे वर्णन करणारे पोवाडे महाराष्ट्रात अत्यंत प्रसिद्ध आहेत. पोवाडा सादर करताना डफ, तुणतुणे, टाळ ही वाद्ये वापरली जातात.

- **अभंग :**

या गीतप्रकारात भक्तिरसाची अभिव्यक्ती दिसून येते. उदा. संत तुकारामांनी रचलेली विठ्ठलाची स्तुती करणारे, तसेच जीवनाविषयी तत्त्वज्ञान सांगणारे अनेक अभंग प्रसिद्ध आहेत. अभंग सादर करताना तबला, पेटी, टाळ, मृदुंग या वाद्यांचा वापर केला जातो.

- **कीर्तन :**

कीर्तन म्हणजे कीर्ती सांगणे, ऐकवणे, एखाद्या कल्पनेचे किंवा गोष्टीचे वर्णन करणे. कीर्तन करणाऱ्या कलाकारास कीर्तनकार असे संबोधले जाते. कीर्तनाचा हेतू हा चांगल्या सवयी, चांगली मूल्ये, चांगले विचार लोकांमध्ये रुजवणे हा असतो. उदा. संत गोडगेबाबांचे सार्वजनिक स्वच्छतेबद्दलचे कीर्तन. कीर्तनामध्ये पेटी, टाळ, चिपळ्या, मृदुंग, तबला या वाद्यांचा वापर केला जातो.

- **भारूड :**

हा संगीतप्रकार संत एकनाथांनी प्रसिद्ध केला. कीर्तनासारखीच भारूडामध्ये देखील संगीताचा वापर करून गोष्ट सांगितली जाते. मात्र, भारूड हे समूहाने सादर केले जाते. समाजप्रबोधन हा भारूडाचा मूळ उद्देश आहे.

- **जागरण–गोंधळ :**

देवीसाठी गोंधळ व खंडेरायासाठी जागरण घालण्याची प्रथा आहे. या दोन्ही प्रकारात संगीताचा व वाद्यांचा वापर केला जातो.

- **भजन :**

हे कुठल्याही धार्मिक किंवा आध्यात्मिक गाण्याला दिलेले सर्वसाधारण नाव आहे. पुराणातील संकल्पना, साधुसंतांच्या शिकवणीवर सर्वसामान्यपणे भजने आधारित असतात. त्यात देखील टाळ, तबला, पेटी, मृदुंग यासारख्या वाद्यांचा वापर केला जातो.

- **लावणी :**

हा एक पारंपरिक गायन आणि नृत्य प्रकार आहे जो ढोलकीच्या तालावर सादर केला जातो. लावणीचा जोशपूर्ण ठेका हे त्याचे वैशिष्ट्य आहे. ढोलकी व पेटी या वाद्यांचा लावणी सादर करताना प्रामुख्याने वापर केला जातो.

- **कव्वाली :**

हा सुफी भक्तीपर संगीताचा प्रकार आहे. कव्वाली हा सामूहिक गायन प्रकार असून त्याचा देखील एक विशिष्ट ठेका असतो. कव्वाली सादर करताना एका विशिष्ट पद्धतीने टाळ्या वाजवण्याची पद्धत आहे.

• **लोकप्रिय चित्रपट संगीत :**

चित्रपट संगीतात आपल्याला सर्व प्रकारच्या संगीताची झलक बघायला मिळते, मात्र कुठल्याही एका प्रकाराला धरून हे संगीत नसते. शास्त्रीय व लोकसंगीतातून अनेक गोष्टी चित्रपट संगीतात स्वीकारलेल्या आपल्याला दिसतात.

• **नाट्यसंगीत :**

महाराष्ट्रात संगीत नाटकांची फार मोठी परंपरा आहे. पूर्वीच्याकाळी संगीत नाटके अत्यंत लोकप्रिय असत. संगीत नाटकांमध्ये अभिनेते/अभिनेत्री मौखिक संवादांबरोबर गायनातून देखील आपल्या भावना व विचार व्यक्त करतात. संगीत नाटकांमध्ये सादर केल्या जाणाऱ्या संगीताला नाट्यसंगीत असे संबोधले जाते. नाट्यसंगीतातील गाण्याला 'पद' असे संबोधले जाते. नाट्यसंगीत हे बहुतांशवेळा शास्त्रीय संगीतावर आधारलेले असते. बालगंधर्व, मास्टर दीनानाथ मंगेशकर, पंडित वसंतराव देशपांडे, पंडित जितेंद्र अभिषेकी असे अनेक मोठे नाट्यसंगीतकार महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले. तसेच शिलेदार कुटुंबीयांचे देखील नाट्यसंगीतात मोलाचे योगदान आहे.

• **गझल :**

गझल या संगीत प्रकारात शब्दांचे फार महत्त्व असून शब्दांचे सौंदर्य अधिक खुलवण्याच्या दृष्टीने चाल बांधली जाते. गझल या काव्यप्रकाराची एक ठरावीक रचना असते व त्यानुसारच हा काव्यप्रकार लिहिला जातो. गझलचे विषय विविधांगी असतात. पूर्वीच्या काळी गझल ही फक्त फारसी किंवा उर्दूमध्ये रचली जात असे मात्र आता गझल हिंदी, मराठी अशा अनेक भाषांमध्येदेखील रचली जाते.

• **इतर संगीत प्रकार :**

चित्रपट संगीताव्यतिरिक्त, चित्रपटात नसलेले, कलाकारांनी स्वतंत्रपणे निर्माण केलेले, कुठल्याही एका विशिष्ट संगीत प्रकारात न मोडणारे संगीत हा एक वेगळा संगीत प्रकार मानता येईल.

## १२. थोडा शोध घ्या

- तुमच्या भागात कोणत्या प्रकारचे लोकसंगीत पूर्वापार चालत आले आहे?
- तुमच्या गावात /शहरात कोणते कलाकार लोकप्रिय आहेत?
- तुमच्या गावात /शहरात संगीताचे सार्वजनिक कार्यक्रम होतात का? शक्य असल्यास एखाद्या कार्यक्रमास उपस्थित रहा.

## १३. चाल बांधणे :

एखाद्या कवितेचे जेव्हा गाण्यात रूपांतर करायचे असते तेव्हा त्या कवितेवर चाल बांधावी लागते. चाल बांधताना संगीतकार त्या कवितेचा आशय, शब्दरचना, कवितेत वापरली गेलेली भाषा कोणत्या भौगोलिक भागातील आहे. त्यानुसार संगीत प्रकार ठरवून चाल बांधतात. एकदा चाल ठरल्यावर त्या गाण्याच्या सादरीकरणासाठी कोणती वाद्ये वापरली जावीत याचा विचार होतो.

चित्रपटांमधील गाण्यांना चाल देताना कधी-कधी चाल आधी बांधून नंतर त्यानुसार काव्य रचले जाते. चित्रपटांमधील गाण्यांना चाल बांधताना त्या गाण्याची चित्रपटामधील संभाव्य जागा, प्रसंग, त्यातील पात्र, त्या गाण्याने प्रेक्षकांवर काय परिणाम साधणे अपेक्षित आहे इत्यादी अनेक बाबींचा विचार केला जातो.

### १४. चला उपयोजन करू या :

विद्यार्थ्यांचे गट करा. तुमच्या पुस्तकातून किंवा इतर कुठल्याही कवितेच्या पुस्तकातून एक कविता निवडा. त्या कवितेचे विश्लेषण खालील मुद्द्यांच्या आधारे करा–

(१) शब्द कसे आहेत? कुठल्या भावना शब्दांकित करायचा प्रयत्न कवीने केला आहे?

(२) कवितेचा मूड कसा आहे?

(३) जर या कवितेचे गाण्यात रूपांतर करावयाचे असेल तर त्या गाण्याच्या ठेक्याची तुम्ही कशी कल्पना कराल? तो जलद असेल की संथ?

(४) गाण्याचा प्रकार तुम्ही शिकलेल्या संगीत प्रकारांपैकी कशासारखा असावा असे तुम्हाला वाटते?

(५) वरील मुद्दे लक्षात घेऊन कवितेतील पहिल्या ४ ओळींसाठी तुम्हाला स्वतःची चाल बांधता येईल का? किंवा एखाद्या वेगळ्या गाण्याची चाल त्या कवितेला योग्य असेल असे तुम्हाला वाटते का?

(६) गाण्यासाठी तुम्ही कोणती वाद्ये वापराल?

(७) शक्य झाल्यास गाण्याचे सादरीकरण करा.

## मूल्यमापन

**भारांश : १०%**

| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
|---|---|---|---|---|
| नाटकातील कामगिरी | व्यक्तिरेखेच्या आवाजाचा आणि देहबोलीचा पुरेसा विचार दिसला. नाटकात संघर्ष होता. | व्यक्तिरेखेच्या आवाजाचा आणि देहबोलीचा काही प्रमाणात विचार दिसला. नाटकात संघर्ष नव्हता. | व्यक्तिरेखेच्या आवाजाचा आणि देहबोलीचा अजिबात विचार दिसला नाही. नाटकात संघर्ष नव्हता. | |
| संगीत | संगीतातील ठेका, सुरावट आणि भाव कवितेशी मिळताजुळता होता. सुरावट स्वतः बांधलेली होती. | संगीतातील ठेका, सुरावट आणि भाव कवितेशी मिळताजुळता होता. | संगीतातील ठेका, सुरावट आणि भाव यांच्यापैकी एकच गोष्ट कवितेशी मिळतीजुळती होती. | |
| नृत्य दिग्दर्शन | नृत्य गाण्याच्या तालात बसत होते. नृत्यातील हालचाली, गाण्यातील शब्दांशी आणि संगीताशी जुळणाऱ्या होत्या. नर्तकाच्या चेहऱ्यावरचे हावभाव साजेसे होते. | डावीकडील ३ पैकी दोन मुद्दे सादरीकरणात होते. | डावीकडील ३ पैकी एकच मुद्दा सादरीकरणात होता. | |


पाचही मित्र-मैत्रिणी त्यांच्या लाडक्या जागी जमतात. सगळे धैर्यधर व धैर्यशीलाला शोधतात.
लोबो! तू त्या दोघांना कुठे पाहिले आहेस का रे?
नाही राघव, मला वाटते, समीनाने त्यांना शेवटचे पाहिले होते.
त्यांना लवकर शोधायला हवे. मला किती गोष्टीत त्यांची मदत हवी आहे
त्याला दोन दिवस झालेत!
ते बघा! आकाशात
कुठे होता तुम्ही दोघं?
आम्ही परत चाललो होतो. तुम्हांला शेवटचे भेटायला आलो आहोत.
पण तुम्ही नाही जाऊ शकत असे. आम्हांला कोण मदत करणार?
तुम्हांला आता आमची गरज नाही. तुमची लढाई आता तुम्हांलाच लढावी लागेल. तुम्ही आता स्वत:बद्दल विचार करायला लागला आहात. तुम्ही आता थोडं बाहेरच्या जगाकडे बघायची गरज आहे. नव-नव्या संधी तुमची वाट बघत आहेत. तुमच्या शोधासाठी शुभेच्छा!

## संदर्भ


१. आकृती – आभा भागवत

२. वाचिक अभिनय – डॉ. श्रीराम लागू

३. कला से सिखना – जेन साही, रोशनी साही

४. शिक्षा का वाहन : कला – देवीप्रसाद

५. कलेचा इतिहास – पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

६. २१ व्या शतकातील जीवनकौशल्यांवर संशोधन व विकास, श्यामची आई फाऊंडेशन.


७. An actor prepares – Constantin Stanislavski

८. Mindset : Key Takeaways, Analysis and Review – Carol Dweck

९. Introduction to Conflict Management : Improving performance using the TKI – Kenneth Wayne Thomas


## संदर्भासाठी संकेतस्थळे



1. www.safindia.org
2. http://mahacareermitra.in
3. http://ccrtindia.gov.in/
4. http://ncert.nic.in/ncert/aerc/pdfs/training_resource_materials.pdf
5. https://www.sps186.org/downloads/basic/571702/conflict_management_styles.pdf
6. https://en.wikipedia.org/wiki/Environmental_enrichment
7. https://dweck.socialpsychology.org/
8. https://en.wikipedia.org/wiki/Neuroplasticity
9. http://www.thebetterindia.com/53993/10-indian-folk-art-formssurvived-paintings/









































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

स्व–विकास व कलारसास्वाद इयत्ता नववी (मराठी)

₹ ६४.००